# शशिकला क्षयरोग आरोग्यधाम,
## जयसिंगपूर जि. कोल्हापूर.

email - shashikalatbsanitorium@gmail.com | बाहय रुग्ण विभाग , सांगली-कोल्हापूर रोड,तुलसी ब्लड बँकेमागे ,जयसिंगपूर.

दुरध्वनी.८३९०२९१५४२


जा.क्र.शक्षआज/आस्था/आहार सेवा जाहिरत प्रसिध्दी/ 72 /२६
दिनांक - १०/०२/२०२६

# जाहीर सुचना

विषयः-आहारसेवा पुरवठा दरपत्रक सादर करणेबाबत......

उपरोक्त विषयानुसार शशिकला क्षयरोग आरोग्यधाम, जयसिंगपूर जिल्हा कोल्हापूर येथे रुग्णालयामध्ये क्षयरुग्णांसाठी आहार सेवा पुरविणेकरिता इच्छुक व पात्र स्थानिक पुरवठादारांकडुन खालीलप्रमाणे दरपत्रके मागविणेत येत आहेत. तरी सदरची दरपत्रके सिलबंद लखोटयात सर्व कागदपत्रे व दरपत्रकासह दिनांक १८/०२/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत पाठवावीत, त्यानंतर आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

**क्षयरुग्णांचा पुर्ण आहार**

| वेळ | मेनु | परिमाण |
|---|---|---|
| सकाळी ७.०० वाजता | चहा | १ कप (२०० मिली) |
| सकाळी ८.३० वाजता | नाष्टा ( दुध,केळी, अंडे, गुळ शेंगदाण्याचा लाडु) | दुध २००मिली, केळे १, उकडलेले अंडे १, शेंगदाण्याचा लाडू १ |
| | उपमा,शिरा, पोहे, इडली,शाबुदाणा खिचडी,मिसळ पाव ) | २००ग्रॅम |
| दुपारचे जेवण | भात, चपाती,डाळ,पालेभाजी, कंदभाजी, सॅलेड | १ वाटी भात (१६० ग्रॅम) ३ चपाती, १ वाटी (१४० ग्रॅम) भाजी, सॅलेडमध्ये गाजर, काकडी,कांदा ,बीट, व लिंबू |
| सायंकाळी ४.००वाजता | चहा | १ कप (२०० मिली) |
| रात्रीचे जेवण | भात, चपाती,डाळ,पालेभाजी, कंदभाजी, सॅलेड | १ वाटी भात (१६० ग्रॅम) ३ चपाती, १ वाटी (१४० ग्रॅम) भाजी, सॅलेडमध्ये गाजर, काकडी,कांदा ,बीट, व लिंबू |
| दोन वेळ चहा सकाळी नाष्टा (उपमा,शिरा, पोहे, इडली,शाबुदाणा खिचडी,मिसळ पाव यापैकी एक) व ज्यादा प्रथिने युक्त आहार (दुध,केळी, अंडे, गुळ शेंगदाण्याचा लाडु), दोन वेळचे जेवण वरीलप्रमाणे अशा सर्व आहाराचा एकुण दर पाठविणेत यावा. | | |

**टीप :- रुग्ण संख्येप्रमाणे आहार पुरविणेत यावा.**

**आवश्यक कागदपत्रेः-**

१) संस्था नोंदणी प्रमाणपत्र /शॉप ॲक्ट प्रमाणपत्र(चालु वर्षातील नूतनीकरणसह)
२) राज्य शासनाच्या सक्षम प्राधिकरणाने निर्गमित केलेले अन्न व औषध प्रशासनाकडील परवाना , चालू वर्षाच्या नुतनीकरणासह स्कॅन कॉपी
३) जीएसटी रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट स्कॅन कॉपी
४) जीएसटी रजिस्ट्रेशन लागू नसलेचे सर्टीफिकेट
५) आयकर नोंदणी प्रमाणपत्राची स्कॅन कॉपी (पॅन कार्ड)

Scanned with OKEN Scanner

**खालील अटी व शर्तीस अधिन राहुन दरपत्रक सादर करावे.**

१) दरपत्रक "मा.वैदयकिय अधिकारी, शशिकला क्षयरोग आरोग्यधाम जयसिंगपूर." यांचे नावे सादर करावे व लखोटयावर "आहारसेवेचे दरपत्रक" असा उल्लेख असावा.

२) सदर बाबीकरिता शासनाकडून मंजूरी व अनुदान उपलब्ध झाले नंतरच कंत्राटी आहार सेवा सुरु ठेवली जाईल.

३) कोणत्याही परिस्थितीत संस्थेकडुन अग्रिम दिला जाणार नाही.

४) स्वयंपाकगृहाचे दरमहा भाडे रु ५००/- धनादेशाद्वारे या कार्यालयास देणे बंधनकारक आहे.

५) दरपत्रकामधील दर हे फक्त एजन्सी नॉमिनेट करणेकरिता निश्चित केले जातील. शासनाद्वारे वेळोवेळी मार्गदर्शक सुचनेनुसार दिलेले दर याला अधिन राहुन देयके अदा करणेत येतील.

६) दरपत्रकधारकास पुरवठा कालावधीमध्ये कोणतेही कर लागू झाले/ वाढुन आलेस मंजूर दरपत्रकातील दर वाढून मिळणार नाहीत.सदर सर्व कर भरण्याची जबाबदारी पुरवठादाराची राहील.

७) रुग्ण संख्येप्रमाणेच आहारसेवेची देयके अदा करणेत येतील.

८) रुग्णांना चहा/नाष्टा व जेवणाचा दर्जा उत्तम प्रकारचा राहणे आवश्यक आहे. रुग्णाकडुन आपणाबाबत काही तक्रार झालेस पुरवठाधारकास लेखी समज दिली जाईल. वारंवार तक्रारी असतील तर ठेका रद्द करणेत येईल.

९) रुग्णांना त्यांचे ठिकाणी चहा,नाष्टा व जेवण सुविधा स्वखर्चाने उत्तम प्रतीचे पुरविणे बंधनकारक राहील.

१०) रुग्णांना भोजन वाढण्यासाठी पुरवठादाराने नेमलेला कर्मचारी वर्ग स्वच्छ , निरोगी, टापटीप तसेच निर्व्यसनी असावा.

११) पुरवठादाराने नेमलेले कर्मचारी कोणत्याही गुन्ह्याशी अथवा कायदेभंग विषयक प्रकरणाशी संबंधित नसावा याची दक्षता घेण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१२) अन्न व भेसळ प्रतिबंधक कायदयाचे पालन करण्याची तसेच त्या अंतर्गत कोणत्याही कार्यवाहीची संपूर्ण जबाबदारी पुरवठादाराची राहील.

१३) अन्नविषबाधा होऊन शारिरिक/जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१४) काही कारणास्तव भोजन सुविधा पुरविणे ठेकेदारास शक्य नसल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना देणे आवश्यक आहे, त्यानंतर करार संपुष्टात येईल.

१५) स्वयंपाकगृह दररोज स्वच्छ व निटनेटका ठेवण्याची जबाबदारी ठेकेदाराची राहील.आठवडयातून एकदा स्वयपाकगृह फिनेल/ॲसिड वापरुन स्वच्छ करुन देण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे.,तसेच स्वखर्चाने स्वयंपाकगृहाचे पेस्ट कंट्रोल करावे लागेल.

१६) स्वयंपाक गृहातील पाण्याचा वापर निव्वळ भांडी धुणे, भाजीपाला धुणे, स्वयंपाक करणे, स्वयंपाकगृह व उपहारगृहाची स्वच्छता यासाठीच करता येईल. इतर बाबीसाठी पाण्याचा वापर करता येणार नाही.

१७) विजेचा वापर लाईट, पंखे, वॉटर फिल्टर, वॉटर कुलर, किचनमधील मिक्सर इ.साठी करता येईल.याशिवाय विजेवर चालणारी इतर उपकरणे वापरता येणार नाहीत.

१८) या संस्थेच्या प्रतिमेला धक्का पोहचेल किंवा संस्थेची प्रतिमा मलिन होईल अशी कोणतीही कृती पुरवठादाराने करु नये.

१९) पुरवठादाराने आहार पुरवठा दर्जेदार करणे बंधनकारक आहे. अन्नपदार्थ तयार करण्यासाठी उत्तम दर्जाचे किराणामाल, वस्तु,मसाले, भाजीपाला व कच्चामाल वापरला पाहिजे. मा.वैदयकिय अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या कर्मचाऱ्यास केव्हाही स्वयंपाकगृह तसेच तेथील साहित्य तपासण्याचे अधिकार असतील.सदरचे साहित्य प्रयोगशाळेतून तपासणी करुन घेतले जाईल.त्याचे शुल्क ठेकेदारास अदा करावे लागेल.योग्य दर्जा नसलेचे निदर्शनास आल्यास ठेका रद्द करण्यात येईल.

२०) सकाळचा नाष्टा, दोन वेळचा चहा, दुपारचे व रात्रीचे जेवण रुग्णाच्या ठिकाणी वेळेवर स्वखर्चाने उत्तम प्रतीचे पुरविणे आवश्यक आहे.

२१) रुग्णांचे प्रत्यक्ष संख्येनुसार चहा,नाष्टा व जेवणाची रक्कम दरपत्रकेमधील मंजूर दराप्रमाणे दरमहा निधी उपलब्धतेनुसार अदा करणेत येईल.तसेच **नियमानुसार टीडीएसची रक्कम कपात करणेत येईल.**

Scanned with OKEN Scanner

२२) मंजूर दरपत्रकेची **मुदत** ही दरपत्रक मंजुर झालेल्या दिनांकापासुन **पुढे १ वर्षाकरिता राहील.**

२३) सदर ठेकेदाराचा कालावधी संपल्यानंतर नवीन दरपत्रक अस्तित्वात येण्यास काही अपरिहार्य कारणास्तव विलंब झाल्यास शासनाकडून मुदतवाढीचा प्रस्ताव किंवा आदेश प्राप्त झाले नंतर त्या कालावधीत सध्याच्याच अटी व शर्तीनुसार दोघांच्या संमतीने ३ महिन्याच्या कालावधीसाठी किंवा पुढील नवीन दरपत्रक अस्तित्वात येईपर्यंत चालु राहील.

२४) मंजुर दरपत्रकधारकाने शर्ती व अटींचा भंग केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी दरपत्रकधारकाची राहील. दरपत्रक मंजुर झालेल्या ठेकेदाराने अटी व शर्तीचा भंग केल्याचे निदर्शनास येताच पूर्वसुचनेशिवाय कंत्राट रद्द करण्यात येईल आणि मंजुर दरपत्रकधारकाचे नाव काळया यादीत घालून कडक कारवाई करण्यात येईल.

२५) आहार सेवेचे वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील.

अ) चहा व नाष्टा :- सकाळी ०७ ते ९.००

ब) दुपारचे जेवण :- दुपारी १२ ते १२.३०

क) दुपारचा चहा :- दुपारी ४.०० ते ५.००

ड) रात्रीचे जेवण :- रात्री ७.३० ते ८.३०

२६) स्वयंपाकगृहामध्ये आहारसेवेशी निगडीत साहित्यच ठेवणेस परवानगी राहील. इतर वैयक्तिक/प्रापंचिक/वाहने स्वयंपाकगृह परिसरात ठेवणेची नाहीत.

२७) आहार पुरवठादाराने स्वयंपाकगृहातील कोणत्याही शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्यास त्याची भरपाई संबंधित ठेकेदारास देय होणाऱ्या रक्कमेतुन वसुल केली जाईल.

२८) दरपत्रककाराने सदर कामासाठी उपठेकेदार नेमू नयेत. उपठेकेदार नेमलेचे निदर्शनास आलेस ठेका रद्द करणेत येईल.

२९) दरपत्रक कोणतेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्वीकृत करणे, नाकारणे, रद्द करणे तसेच दरप्रकिया रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार कार्यालय प्रमुखांनी राखुन ठेवलेले आहेत.

३०) दरपत्रक मंजूर झाल्यानंतर ८ दिवसांमध्ये करारनामा रु.५००/- चे स्टॅम्प पेपरवर स्वखर्चाने वेगळा करावा लागेल.

३१) सदर आहार सेवा पुरवठा आदेश मिळालेपासुन १ वर्ष कालावधीकरिता ग्राह्य राहील.

३२) सदर दरपत्रक प्रक्रियेबाबतच्या न्यायप्रविष्ठ बाबी जयसिंगपूर शहर न्याय परिक्षेत्रात मर्यादीत राहतील.वरील अटी व शर्ती प्रमाणे सिलबंद दरपत्रके मा.वैदयकिय अधिकारी शशिकला क्षयरोग आरोग्यधाम जयसिंगपूर जिल्हा कोल्हापूर यांचे नावाने दिनांक १८/०२/२०२६ रोजी कर्यालयीन वेळेपर्यंत या कार्यालयास सादर करावीत. दि.१८/०२/२०२६ रोजी नंतर प्राप्त झालेली दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.

३३) भविष्यामध्ये शासनाकडून आहारसेवेबाबत किंवा या आरोग्य संस्थेबाबत कोणताही सामूहिक अथवा वैयक्तिक निणर्य झालेस आहारसेवा रद्द करणेचा निर्णय या कार्यालयास राखीव राहील.

(डॉ.एस.सी.शिखरे)
वैदयकिय अधिकारी,गट-अ

MEDICAL OFFICER CLASS-2
SHASHIKALA TB SANITORIUM, JAYSINGPUR

Scanned with OKEN Scanner